# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग

केंद्र क्र.१, १३ वा मजला, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, मुंबई-४०० ००५.
**दूरध्वनी क्र.** ०२२-२२१६३९६४/६५/६९ **फॅक्स क्र.** ०२२-२२१६३९७६
**ई-मेल** : mercindia@merc.gov.in / mercindia@mercindia.org.in
**संकेत-स्थळ** : www.mercindia.org.in/www.merc.gov.in


जाहिरात क्र. २२/२०१८-१९

## जाहीर नोटीस

**महाराष्ट्रातील वितरण परवानाधारकांनी आर्थिक वर्ष २०१७-१८ साठी नूतनशील ऊर्जा खरेदीच्या बंधनाच्या लक्ष्यांकाच्या केलेल्या पुर्ततेची पडताळणी करण्यासाठी आयोगाने सुरु केलेल्या कार्यवाहीसंबंधी जनतेकडून सूचना आणि हरकती मागविण्याबाबत**

नूतनशील ऊर्जा खरेदीचे बंधन (आरपीओ), त्याचे पालन व नूतनशील ऊर्जा प्रमाणपत्र चौकटीचे कार्यान्वयन विनियम, २०१६ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (आयोग) राज्यातील वितरण परवानाधारकांनी नूतनशील ऊर्जा खरेदीच्या बंधनाच्या लक्ष्यांकाच्या केलेल्या पूर्ततेची पडताळणी वार्षिक तत्वावर करीत असतो. महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण (महाऊर्जा) ने सादर केलेल्या माहितीच्या आधारे, आयोगाने, खालील प्रकरणांमध्ये राज्यातील वितरण परवानाधारकांनी आर्थिक वर्ष २०१७-१८ साठी नूतनशील ऊर्जा खरेदीच्या बंधनाच्या लक्ष्यांकाच्या केलेल्या पूर्ततेची पडताळणी करण्यासाठी कार्यवाही सुरु केली आहे व वितरण परवानाधारकांना त्यांच्या आर्थिक वर्ष २०१७-१८ साठीच्या लक्ष्यांकांच्या पूर्ततेची तपशीलवार माहिती आयोगास देण्याचे निर्देश दिले आहेत.

| अनु. क्र. | वितरण परवानाधारक | प्रकरण क्र. |
|---|---|---|
| १ | महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लिमिटेड | सन २०१९ चे प्र.क्र.३६ |
| २ | बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम | सन २०१९ चे प्र.क्र.३७ |
| ३ | टाटा पॉवर कंपनी लिमिटेड (वितरण) | सन २०१९ चे प्र.क्र.३८ |
| ४ | अदानी इलेक्ट्रीसिटी मुंबई लिमिटेड | सन २०१९ चे प्र.क्र.३९ |
| ५ | इंडियन रेल्वे | सन २०१९ चे प्र.क्र.४० |
| ६ | माईंडस्पेस बिझनेस पार्क प्रा.लि. | सन २०१९ चे प्र.क्र.४१ |
| ७ | गिगाप्लेक्स इस्टेट प्रा.लि. | सन २०१९ चे प्र.क्र.४२ |

त्यानुसार वितरण परवानाधारकांनी सविस्तर माहिती आयोगास सादर केली असून या माहितीची एक प्रत, 'महाऊर्जा' ने सादर केलेल्या माहितीसह, आयोगाच्या www.merc.gov.in/www.mercindia.org.in या संकेतस्थळावर उतरवून घेण्याच्या स्वरूपात उपलब्ध आहे.

वितरण परवानाधारकांनी व महाऊर्जाने सादर केलेल्या माहितीवर, आयोग जनतेकडुन अभिप्राय, सूचना आणि हरकती लेखी मागवित असुन त्या सहा (१+५) प्रतींमध्ये आयोगाचे सचिव यांना, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, १३ वा मजला, केंद्र क्र. १, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, मुंबई-४०० ००५ येथे व्यक्तिश: किंवा पोस्टाने, किंवा फॅक्स किंवा ई-मेल (फॅक्स: ०२२-२२१६३९७६. ई-मेल : mercindia@merc.gov.in) द्वारा या पत्त्यावर **शुक्रवार, दिनांक १५ मार्च, २०१९** रोजी किंवा त्यापूर्वी मिळतील अशा रीतीने पाठवाव्यात.

सदर अभिप्राय, सूचना आणि/किंवा हरकती पाठविणाऱ्याने त्याचे पूर्ण नाव, पोस्टाचा पत्ता आणि, असल्यास, ई-मेलचा उल्लेख करावा. हरकती कोणत्याही संस्थेच्या किंवा ग्राहक वर्गवारीच्या वतीने पाठविण्यात येत असतील तर तसे त्यात नमूद करण्यात यावे. तसेच सूचना व हरकती पाठविणाऱ्या व्यक्तिस आपले म्हणणे व्यक्तिशः मांडावयाचे असेल तर ते देखील त्यामध्ये नमूद करण्यात यावे, म्हणजे अशा व्यक्तीला, आयोगाकडून, **शनिवार, दि. १६ मार्च, २०१९ रोजी सकाळी १०.०० वाजता, आयोगाच्या १३ वा मजला, केंद्र क्र. १, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, मुंबई, ४०० ००५** या पत्त्यावरील कार्यालयात आयोजित करण्यात येणाऱ्या जाहीर सुनावणीच्या वेळी त्याचे म्हणणे मांडण्याची संधी देण्यात येईल. यासाठी कोणतीही वेगळी सूचना देण्यात येणार नाही.

**शुक्रवार, दिनांक १५ मार्च, २०१९** रोजी किंवा त्यापुर्वी प्राप्त झालेले सर्व अभिप्राय, सूचना आणि/किंवा हरकती आयोगाकडून आदेशास अंतिम स्वरूप देण्यापुर्वी विचारात घेण्यात येतील.

**ठिकाण :- मुंबई** — **सचिव,**
**दिनांक :- २१ फेब्रुवारी, २०१९** — **महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग**

**Size 8 X 23**